MHSN07000084-2022

**<u>रे.दि.मु. नं. २६/२०२२ मधील नि. ४४ खालील आदेश</u>**

**(श्रीमंती कलढोणे वगैरे वि. लक्ष्मण माळी वगैरे )**

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तूतचा दावा सरस निरस मानाने वाटप होवून तुटक कब्जा मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार दावा कलम १ब या घरमिळकतीची वर्णन करताना मालमत्ता क्रमांक ८५१ चा सदरचा मालमत्ता क्रमांक १३८४ असा पडलेला आहे व दोन्ही मिळकती एकच आहेत त्यामुळे दावा मिळकती १ब च्या वर्णनामध्ये पुढील प्रमाणे दुरूस्ती मागत आहेत. यातील वादी यांनी दावा कलम १ब मध्ये वरुन चौथ्या ओळीनंतर १५० चौ. फुट या शब्दानंतर "**पुढे या घराचे सन २०२३ ते २०२७ या सालाकरीता कर आकारणी नोंद वही मध्ये अनुक्रमांक ९०९ रस्त्याचे नाव रानमळा रस्ता गट नंबर ७२ आणि मालमत्ता नंबर १३८४, ८५१ मालकाचे नाव लक्ष्मण परशुराम माळी / परशुराम महादु माळी, वैशाली लक्ष्मण माळी, भोगवटदाराचे नाव यामध्ये खुद्द मालमत्तेचे वर्णन यामध्ये आरसीसी पध्दतीचे बांधकाम लांबी २८ x २४ फुट रुंदी चे क्षेत्र ६७२ चौ. फुट (क्षेत्र मिटरमध्ये ६२.४३ चौ.मि.) तळमजला आरसीसी पध्दतीचे बांधकाम लांबी १३ x १० फुट रुंदी चे क्षेत्र १३० चौ. फुट (क्षेत्र मिटरमध्ये १२.०८ चौ.मि.) तळमजला** " अशी दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

३. वादीचे अर्जातील पुढील कथनाप्रमाणे सदरची दुरुस्तीमुळे दाव्याच्या

मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्ती प्रमाणे दाव्यात बदल करणे न्याय व हितकारक आहे.

४. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन तिव्र आक्षेप नोंदवला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीस या स्टेजला अशा प्रकारची तथाकथीत दुरुस्ती मागता येत नाही. प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. १ यांनी दि. २०.०७.२०२२ रोजी सविस्टर कैफियत दिलेली आहे. त्यामुळे वादीस पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे सन २०२२ ते २०२६ पर्यंत वादीने कोणतीही वेळेत पूर्तता केली नाही. केवळ प्रतिवादीचे कैफियतीतील बचाव पाहून केवळ प्रतिवादीचे नुकसान करण्यासाठी वादीने प्रस्तूतची दुरुस्ती मागितली आहे. सदर दुरुस्ती योग्य व कायदेशीर नाही व मुदतीतही नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ वादीस सामील आहेत. प्रतिवादी क्र. २ चे सल्यानुसार व कागदपत्रांवरुन काल्पनिक दुरुस्ती मागितली आहे. केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी व चौकशीचे काम प्रलंबित ठेवण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दिल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज जास्तीत जास्त कॉस्ट करुन फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

६. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने तुटक वाटप होवून कब्जेकरीता व कायम मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. दि. १६.१२.२०२५ रोजी प्रकरणार वाद मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. प्रकरण वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबीत असताना प्रस्तूतचा अर्ज देण्यात आलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार दावा प्रलंबीत असताना ग्रामपंचायत कार्यालय मळणगाव यांनी वाद मिळकतीचे उतारे निर्गमित केले असल्यामुळे अर्जात सुचवलेली दुरुस्ती करणे क्रमप्राप्त आहे. याउलट प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ याने दि. २०.०७.२०२२ रोजी लेखी कैफियत दाखल केलेली असल्याने वादीस यापूर्वीच कल्पना होती. तरी देखील वादीने पूर्तता केलेली नाही. वादीने सादर केलेला अर्ज प्रतिवादीची कैफियत व कागदपत्रे पाहून केलेला आहे. प्रस्तूतचा अर्ज केवळ प्रकरणात विलंब होण्यासाठी दिलेला असल्याने तो फेटाळण्याची विनंती केली आहे.

७. प्रस्तूत प्रकरणात अद्याप पुराव्यास सुरुवात झालेली नाही. परंतू प्रतिवादीने २०.०७.२०२२ रोजी नि. २५ वर लेखी कैफियत सादर केलेली आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार सदर लेखी कैफियत व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर प्रस्तूतचा अर्ज विलंबाने दिलेला असल्याचे दिसत आहे. परंतू प्रतिवादीच्या कथनानुसार प्रस्तावित दुरूस्ती चुकीची आहे असा कोणताही आक्षेप नाही. प्रस्तूतचा दावा हा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे सर्व वाद मिळकतींची प्रत्यक्ष माहिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. दाव्यात अद्याप पुरावा येणे बाकी असल्यामुळे सदर दुरुस्तीबाबत पुरावा देण्याची तसेच वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची प्रतिवादींना संधी आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर केल्यास त्याचा कोणताही विपरीत परिणाम प्रतिवादींवर होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीचा दावा

तांत्रीक बाबींवर खारीज होवू शकतो. परंतु झालेला विलंब विचारात घेता वादींनी प्रतिवादी क्र. १ यांस खर्चाची रक्कम म्हणून रुपये ५००/– (पाचशे फक्त) अदा करावेत. असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस, अर्जात सुचवल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

४. वादीने प्रतिवादी क्र. १ यास खर्चाची रक्कम रुपये ५००/– (पाचशे रुपये) अदा करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.06.29 17:40:31 +0530

दिनांक : २९.०६.२०२६

ठिकाण : कवठेमहांकाळ

**( एम. ए. कुलकर्णी )**

सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,

कवठेमहांकाळ

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 29.06.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 29.06.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 29.06.2026 |